सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र शासन
1-6 MAR 2013
क्रमांक 254
विभाग.......

**नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार आणि संगीताचार्य कै. बळवंत पांडुरंग अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार अंतर्गत निवड समितीची पुनर्रचना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र. अभानासं/सपुर२०१३/प्र.क्र.३८/सां.का.४**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १५ मार्च, २०१३**

**वाचा : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. साकासं २००५/ प्र.क्र.३८८/सां.का.३, दि. ५ एप्रिल,२००६.**

**<u>प्रस्तावना :-</u>** रंगभूमीवरील उत्कृष्ट कामगीरी केलेल्या ज्येष्ठ नाट्य कलाकारास नटवर्य प्रभाकर पणशीकर यांच्या नांवे रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्याची योजना सन २००६-०७ पासून सुरु आहे. सदर पुरस्कारासाठी मान्यवरांची निवड करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचे सर्व सदस्य हे पदनिहाय सदस्य असल्यामुळे या समितीची पुनर्रचना करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्यानंतर शासनाने संगीत रंगभूमीवरील उत्कृष्ट कामगीरी केलेल्या ज्येष्ठ नाट्य कलाकारास संगीताचार्य कै. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नावाने संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्याची योजना सन २००९-१० या वर्षापासून सूरू केली. सदर पुरस्कारासाठी मान्यवरांची निवड करण्यासाठी नटवर्य प्रभाकर पणशीकर महाराष्ट्र रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यासाठी ची समिती गठित करण्यात आली आहे. त्याच समितीस सदर पुरस्कारासाठी कलावंतांची निवड करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

सदर दोन पुरस्कार योजनेतंर्गत गठीत केलेल्या समितीमध्ये अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाच्या अध्यक्षांना सदस्य म्हणून नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :- विचारांती या शासन निर्णयान्वये नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार आणि संगीताचार्य कै. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार अंतर्गत निवड समितीची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यास मान्यता देत आहे :-

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) | अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) | उपाध्यक्ष |
| ३. मा.सचिव, ( सांस्कृतिक कार्य) | सदस्य |
| ४. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई | सदस्य |
| ५. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन | सदस्य |
| ६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

MFS
16.03
श्री.स.सा.का.

समितीचे सर्व सदस्य हे पदनिहाय सदस्य असल्यामुळे या समितीची पुनर्रचना करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

**प्रवास व बैठक भत्ता :-** समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या क्र. प्रवास १०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५,दि.४/१२/९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवासभत्ता व तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दि. २४ मे, २०१२ अन्वये बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

यासाठीचा खर्च हा सदरचा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, प्रधान लेखाशिर्ष २२०५ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०२) (०२) राज्य नृत्य,नाटय, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५ १५०७) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**
**दु. क्र. २२०४९९१२**
**इमेल पत्ता :- tca.gom@gmail.com**

**प्रति,**

१. मा. मंत्री,सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव (सां.का) यांचे स्वीय सहाय्यक
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय
५. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई. यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहीम, मुंबई १६.
६. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहीम, मुंबई १६
७. महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. अवर सचिव (अर्थसं) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती, सां.का.४